11-05-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 05/10/2025 11:22 PM Page 1



# 'समर्थ'मुळे शालेय शिक्षण व्यवस्था होणार सक्षम..!

## संचालक डॉ. महादेव गावस यांचे प्रतिपादन | जीएसएचईसीतर्फे राज्यातील शिक्षकांसाठी कार्यशाळा

टीम दैनिक हेराल्ड

**पर्वरी, दि. १०** : गोवा सरकारने गोवा राज्य उच्च शिक्षण परिषदेच्या (जीएसएचईसी) माध्यमातून समर्थ एक्स ई-गव्हर्नन्स प्लॅटफॉर्मच्या अंमलबजावणीला मान्यता दिलेली आहे.

हा उपक्रम भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने चालवलेल्या राष्ट्रीय स्तरावरील प्रकल्पाचा भाग असून 'विकसित भारत विकसित गोवा २०४७' आणि 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' च्या दृष्टिकोनाशी सुसंगत आहे. या उपक्रमामुळे गोव्यातील शालेय शिक्षण व्यवस्थेचे डिजिटल सक्षमीकरण होणार आहे, असे प्रतिपादन गोवा राज्य समर्थ ई-गव्हर्नन्स प्रकल्प युनिटचे प्रकल्प संचालक डॉ. महादेव गावस यांनी केले.

गोवा राज्य उच्च शिक्षण परिषदेच्या वतीने आयोजित केलेल्या पाचदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेत मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते. या कार्यशाळेत डॉ. महादेव गावस यांनी सलग पाच दिवस १० सत्रांना मार्गदर्शन केले. डॉ. महादेव गावस यांच्या मार्गदर्शनाखाली समर्थ प्रकल्पाचे राज्य समन्वयक म्हणून काम करणारे संजय नाईक, अजय जाधव आणि गोपाळ प्रभू यांनी या संपूर्ण कार्यशाळेचे संयोजन केले. रोहित नाईक, प्रज्ञा तुळसकर आणि सिया शेटगावकर यांच्या तांत्रिक पथकाने कार्यात्मक पैलूंचे व्यवस्थापन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

### राज्यातील १,६०० शिक्षकांना प्रशिक्षण

**उत्तर गोव्यातील शाळांसाठी लेखा संचालनालय, पर्वरी तर दक्षिण गोव्यातील शाळांसाठी, सरकारी वाणिज्य आणि अर्थशास्त्र महाविद्यालय बोर्डा येथे आयोजित केलेल्या या कार्यशाळेत राज्यातील १६०० शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले. सरकारी, अनुदानित आणि खाजगी शाळांमधील मुख्याध्यापक, प्रभारी मुख्याध्यापक आणि संगणक शिक्षकांसाठी १० मार्गदर्शक सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. सुमारे १,४०० हून अधिक शाळांनी यामध्ये सहभाग घेतला.**

### राज्यातील सर्व शाळांमध्ये 'समर्थ'

**२०२५-२६ शैक्षणिक वर्षापासून गोव्यातील सर्व शाळांमध्ये समर्थ एक्स ई-गव्हर्नन्स प्लॅटफॉर्म सुरू करण्याची योजना आखली जात आहे. यासाठी शिक्षकांसाठी तालुकास्तरीय बूट शिबिरे आयोजित केले जातील, ज्यामध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षण आणि डिजिटल साधनांचा व्यावहारिक वापर यावर लक्ष केंद्रित केले जाईल.**



**पर्वरी : मार्गदर्शन करताना डॉ महादेव गावस.**

नर्सरी ते उच्च माध्यमिक पर्यंतच्या विद्यार्थ्यांना ऑनबोर्ड करण्यासाठी समर्थएक्स ई-गव्हर्नन्स हे एक उत्कृष्ट व्यासपीठ, असे बार्देशचे एडीईआय सेसिलिया फर्नांडिस यांनी सांगितले.

समर्थ एक्स ई-गव्हर्नन्समुळे विद्यार्थ्यांची प्रगती, उपस्थिती आणि वार्षिक निकाल सहजपणे मिळू शकतात, असे पर्वरीतील विद्याप्रबोधिनी प्राथमिक शाळेच्या वैष्णवी कांबळे यांनी म्हटले.

गोव्यातील उच्च माध्यमिक शाळांमध्ये समर्थएक्स पोर्टलचा विस्तार हा गोवा सरकारचा एक कौतुकास्पद निर्णय आहे, असे शांतादुर्गा उच्च माध्यमिक शाळा, पिर्णच्या उमेश नाईक यांनी सांगितले.

शिक्षण मंत्रालयाने सुरू केलेले समर्थ ई-पोर्टल हे ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी फायदेशीर असून भारताच्या शिक्षण क्षेत्रातील डिजिटल परिवर्तनातील एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे, असे म्हाळसा नारायणी हायस्कूलचे मुख्याध्यापक म्हाळसाकांत देशपांडे म्हणाले.

पान १ वरून

### तोंडावर शांतता, पाठीमागून वार! युद्धविरामानंतर पाकचे ड्रोन हल्ल

दोन्ही देशांच्या सैन्यदलांना तातडीने योग्य ती पावले उचलण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. १२ मे रोजी दुपारी १२ वाजता दोन्ही डीजीएमओ या निर्णयाच्या अंमलबजावणीचा आढावा घेतील, असे भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी सांगितले. याबाबत भारतातील परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी सोशल मीडिया 'एक्स' वर लिहिले की , भारताने दहशतवादाच्या सर्व प्रकारांविरुद्ध कठोर आणि अढळ भूमिका कायम राखली आहे; ही भूमिका पुढेही अबाधित राहील. या सगळ्या घडामोडींपूर्वी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ' ट्रूथ सोशल' वरील पोस्टमधून जाहीर केले होते की, अमेरिकेच्या मध्यस्थीखाली दीर्घकाळ चाललेल्या वाटाघाटी यशस्वी ठरल्या . त्यांनी या युद्धबंदीची माहिती देताना तिला पूर्ण आणि तात्काळ असे संबोधले. अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनीही या कराराचे स्वागत करत दोन्ही देशांनी तटस्थ स्थळी विविध मुद्द्यांवर चर्चा सुरू करण्यास सहमती दर्शवल्याचे म्हटले होते . पाकिस्तानचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री इशाक दार यांनी ट्विटरवर लिहिले होते की, पाकिस्तान आणि भारताने तात्काळ प्रभावाने युद्धबंदी राबवण्यास मान्यता दिली आहे. प्रादेशिक शांतता आणि स्थैर्य कायम राखणे, हे आमचे प्राधान्य राहील.मात्र पाकिस्तानच्या आर्मीने पाकिस्तान सरकारला झुगारत भारतावरोधात युद्धविरामाचे उल्लंघन केले आहे.

# केरी न्यू इंग्लिश हायस्कूलच्या दहावीच्या विद्यार्थ्यांचा गौरव

टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ७** : केरी पेडणे येथील न्यू इंग्लिश हायस्कूलच्या दहावीचा १०० टक्के निकाल लागल्याबद्दल गुणवंत, यशवंत विद्यार्थ्यांचा शालेय व्यवस्थापन आणि पालक शिक्षक संघटनेतर्फे नुकताच गौरव करण्यात आला.

न्यू इंग्लिश हायस्कूलच्या सभागृहात आयोजित या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शाळेच्या माजी मुख्याध्यापिका बर्था फर्नांडिस, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व्रजेश केरकर, उपाध्यक्ष विठ्ठल गडेकर, खजिनदार मिलिंद तळकर, व्यवस्थापक शैलेंद्र कुबल, सहसचिव दत्ताराम नाईक, कार्यकारी सदस्य सूरज तळकर, बाबुसो तळकर, राजन सावळ, देवेंद्र गाड, पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष अमृत पेडणेकर, उपाध्यक्ष संजना तळकर, सुप्रिया केरकर, मुख्याध्यापक भावार्थ मांद्रेकर आदी उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्याहस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह, भेटवस्तू व गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. मिताली हरमलकर यांनी आभार मानले.



# मडगावात विकासकामांचा शुभारंभ

टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १० : मडगावचे आमदार व गोव्याचे माजी मुख्यमंत्री दिगंबर कामत यांनी शहराच्या विविध भागांमध्ये चार महत्वाच्या विकासकामांचा शुभारंभ केला. मालभाट येथील रेल्वे स्टेशन परिसर सुशोभीकरण प्रकल्पाचे निरीक्षण केले.

आमदार कामत यांनी मालभाट येथील रेल्वे स्टेशन परिसराच्या सुशोभीकरणासाठी प्रस्तावित प्रकल्पाचे सविस्तर पाहणी केली. या प्रकल्पाचा उद्देश प्रवाशांसाठी स्वच्छ व आकर्षक परिसर तयार करणे आणि पादचाऱ्यांना सुलभ व सुरक्षित मार्गदर्शन करणे आहे.

बालभवन, बिंडोळे - आके - अल्तोजवळ नवीन ड्रेनेज सिस्टमचे उद्घाटन केले.

पावसाळ्यात वारंवार होणाऱ्या पाण्याच्या साचलेल्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी, आमदार कामत यांनी बाल भवनजवळ नव्याने बांधलेल्या ड्रेनेज सिस्टमचे उद्घाटन केले. यामुळे बिंडोळे परिसरातील रहिवाशांना आणि बालभवनमध्ये येणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याची माहिती आमदार कामत यांनी दिली. हॉटेल ग्रीन व्ह्यू समोर, मालभाट येथे ड्रेनेज कामाची सुरूवात करण्यात आली. मडगावमधील वर्दळीच्या भागांपैकी एक असलेल्या या ठिकाणी, योग्य निचऱ्याच्या अभावामुळे निर्माण होणाऱ्या समस्येवर मात करण्यासाठी कामत यांनी नवीन ड्रेनेज कामाची सुरुवात केली. या प्रकल्पामुळे पावसाचे पाणी सुरळीत वाहून जाईल आणि परिसरात होणाऱ्या पूरस्थितीला आळा बसणार असल्याचे आमदार कामत यांनी स्पष्ट केले.

**CHANGE OF NAME**

I, **SHOBHA ULHAS DHARGALKAR**, r/o H. No. 453/6, DANVA, CASTELLIN WADDO, TIVIM, BARDEZ, NORTH GOA, GOA - 403507, Hereby change my name from **SHOBHA ARJUN KAMBLE** to **SHOBHA ULHAS DHARGALKAR**. Hereinafter in all my dealings and documents, I will be known as **SHOBHA ULHAS DHARGALKAR.**

# हरमलात गानसरस्वती संमेलनात ज्येष्ठ भजनी कलाकारांचा सत्कार




**हरमल : गानतपस्विनी किशोरीताई आमोणकर संगीत संमेलनात माजीमंत्री विनोद पालयेकर. सोबत चंद्रकांत साळगावकर, पांडुरंग पार्सेकर, उदय पार्सेकर व नंदिनी बेडेकर तसेच सत्कारमूर्ती.**

टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १०** : येथील स्व. सिताराम पार्सेकर गुरुकुल संगीत व सांस्कृतिक संस्था व कला संस्कृती संचालनालय पणजी यांच्या विद्यमाने आयोजित गानसरस्वती श्रीमती किशोरीताई आमोणकर यांच्या स्मृती प्रीत्यर्थ संगीत संमेलनात पेडण्यातील ज्येष्ठ भजनी कलाकारांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी माजीमंत्री तथा गायक विनोद पालयेकर, निवृत्त पोलिस उपअधीक्षक चंद्रकांत साळगावकर, संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग पार्सेकर, संमेलनाचे कार्याध्यक्ष तथा गायक उदय पार्सेकर व श्रीमती किशोरीताई आमोणकर यांच्या शिष्या नंदिनी बेडेकर उपस्थित होते. त्यांच्याहस्ते रामचंद्र केरकर, हरिश्चंद्र नाईक, दिगंबर नाईक, दाजी नर्से, हनुमंत शेटगावकर,अशोक कोनाडकर व न्हानु नाईक यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. हरमलसारख्या ग्रामीण भागात पद्मविभूषण विजेत्या किशोरीताई आमोणकर यांचे शिष्य त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ संगीत संमेलनाचे आयोजन करून उदयोन्मुख कलाकारांना संधी व व्यासपीठ निर्माण करतो, त्याबद्दल गायक उदय पार्सेकर याचे अभिनंदन असल्याचे मत माजीमंत्री विनोद पालयेकर यांनी व्यक्त केले. श्रीमती किशोरीताई आमोणकर यांच्या गायकीने आपण प्रभावित झालो व त्यांचे शिष्य उदय पार्सेकर याना संगीत क्षेत्रात आपल्या ओळखीतून संधी देण्याचा प्रयत्न केला. हे संगीत संमेलन म्हणजे स्वराभिषेक एक जिवंत संगीत असून उदय यांना भविष्यात मोठे यश मिळो, अशा शुभेच्छा निवृत्त पोलिस उपअधीक्षक चंद्रकांत साळगांवकर यांनी व्यक्त केले. यावेळी संमेलनातील

प्रमुख गायिका नंदिनी बेडेकर तसेच सहभागी कलाकारांना माजीमंत्री विनोद पालयेकर हस्ते स्मृतिचिन्ह भेट दिली. प्रारंभी उमा पार्सेकर, तेजस्विनी पार्सेकर यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. सूत्रनिवेदन सोनाली परब यांनी केले तर चंद्रहास दाभोलकर यांनी आभार मानले.

# मयडेत विश्वकर्मा संगीत समारोह सुरू

टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. १०** : बांबुर्डे, मयडे-बार्देश येथील श्री राम सेवा संघातर्फे दि. ११ मे रोजीपर्यंत दहाव्या विश्वकर्मा संगीत समारोहाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संघाचे अध्यक्ष सीताकांत बोरकर यांनी दिली. रविवार, दि. ११ रोजी गोवा सरकारच्या कला व संस्कृती संचालनालयाच्या सहकार्याने दहावा विश्वकर्मा संगीत समारोह होणार असून, दुपारी ३.३० वाजता त्याचे उद्घाटन करण्यात येईल. दुपारी ४ वाजता वरद मालवणकर, हर्ष आजगावकर, वेदांत आनंद गुलडणकर व लाभेश शैलेंद्र कामत यांचे तबला समूहवादन होईल. सायंकाळी ४.१५ वाजता उर्वी उमेश नाईक यांचे गायन, ४.४५ वाजता सर्वेश राणे यांचे सतारवादन, ५.३० वाजता वरद विशाल अलोर्नेकर व लक्षदीप महादेव महादेव गावस यांची संवादिनी जुगलबंदी, ५.३० वाजता अथर्व गायक यांचे बासरी एकलवादन, तर ६ वाजता अर्चना सतीश कामूलकर यांचे गायन होईल. त्यांना संवादिनीवर कार्तिक च्यारी, तर तबल्यावर दत्तराज गोविंद च्यारी संगीतसाथ करतील. रात्री ७.४५ वाजता श्रुती रा. कदम, निधी प. कारेकर, दिशा सा. आरोलकर, स्वरा दि. बिर्मुले, ईशा न. मांद्रेकर, श्रावणी अ. शिरोडकर व सिया नागवेकर यांचे कथक समूह नृत्य सादरीकरण होणार आहे. त्यांना संवादिनीवर सिद्धी देऊ दाभाळे व प्रणव अवधूत च्यारी, तर तबल्यावर कौस्तुभ पांडुरंग च्यारी, वेदांत रा. नाईक व वरद नंदन कमळकर यांची संगीतसाथ लाभणार आहे. रात्री ८ वाजता हळदोणे विधानसभा मतदारसंघाचे आमदार ॲड. कार्लुस फेरेरा, प्रा. शंकर च्यारी, मयडेचे सरपंच सागर नाईक, विश्वकर्मा च्यारी-मेस्त ब्राह्मण समाज, गोवा'चे अध्यक्ष सुहास्य सोमनाथ च्यारी, संस्थेचे अध्यक्ष सीताकांत बोरकर, पालक विशाल अलोर्नेकर व इतर मान्यवरांच्या हस्ते स्पर्धेचे बक्षीस वितरण होणार आहे.

**IN THE COURT OF THE JOINT MAMLATDAR V OF BARDEZ TALUKA AT MAPUSA GOA**
**Case No. JM-V/TNC/PUR/u/s18-C/Anjuna/01/2019**

1. Vassudev Kusta Shirodkar (since deceased, Through his legal heirs a) Mr. Devanand V. Shirodkar b) Mrs. Reema Devanand Shirodkar, Both r/o. H. No. 1079/2, Kutehem Bhat, Anjuna Goa. ....Applicants

V/s

Ms. Lilia Leopoldina Monteiro & Others. ...Opponents

**PUBLIC NOTICE**

1. Ms. Lilia Leopoldina Monteiro, r/o. Mazal Waddo, Anjuna, Bardez Goa 2. Joseph Isidoro Albuquerque, 3. Miss Bella Albuquerque, 4. Miss Justina Albuquerque, All r/o. H. No. 1116 and 1117, Mazal wadda Anjuna, Bardez Goa. ...Opponents

Whereas, the above named applicants have filed an application dated 02/03/2019 under section 18-C of GDD, Agricultural Tenancy Act, 1964 with regards to tenancy purchase in property bearing Sy. No. 89/8 of village Anjuna.

And whereas, applicants vide application dated 06/05/2025 informed that notices sent to the opponents are returned unserved with postal remark Insufficient Address' and that the applicants are not aware of any other addresses of the above Opponents and it is therefore prayed for substitute service to said Opponents by way of publication in daily newspaper.

And whereas this Court is satisfied that this is a fit case for Ordering such service and has made Order to that effect as per Order V Rule 20 (IA) of Civil Procedure Code, 1908.

You are therefore hereby summoned to appear in this Court at Mapusa — Goa in person or by duly authorized agent on **16/06/2025 at 3.00 p.m.** to answer the claim, and as the day fixed for your appearance is appointed for the final disposal of the suit, you must be prepared to produce on that all day the witness upon whose evidence and all documents upon which you intend to rely in support of your defence. Take notice that in default of your appearance as aforesaid on date and time mentioned above, the suit will be heard and determined in your absence.

Give under my hand and the seal of this Court on this 07th day of May, 2025.

Sd/- (Meghana Naik) SEAL
Joint Mamlatdar - V of Bardez
Mapusa Goa

# मराठीतून प्राथमिक शिक्षण घेतल्यास सर्व भाषांवर प्रभुत्व

## ॲड. अमित सावंत | साची डान्स अकादमीमार्फत कलोत्सव कार्यक्रमाचे उद्घाटन

टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १०** : मराठीतून जर प्राथमिक शिक्षण घेतले तर आपण सर्व भाषावर प्रभुत्व आणि त्यावर पकड मिळू शकतो, असे प्रतिपादन मांद्रेचे माजी सरपंच तथा विद्यमान पंच ॲड. अमित सावंत यांनी केले. मांद्रे सावंतवाडा येथील श्री भूमिका मंदिराच्या रंगमंचावर साची डान्स अकादमीमार्फत कालोत्सव कार्यक्रमाचे आयोजन केले होते.त्यावेळी ते प्रमुख पाहुणे या नात्याने बोलत होते.

यावेळी मांद्रेचे सरपंच राजेश मांजरेकर, नवनिर्वाचित उपसरपंच संपदा आजगावकर, माजी उपसरपंच तथा पंचसदस्य तारा हडफडकर, माजी सरपंच तथा विद्यमान पंच बाळा ऊर्फ प्रशांत नाईक, साची डान्स अकादमीचे अध्यक्ष सपना सावंत, नृत्यांगना साची सावंत, मिष्टी सावंत, दादी सावंत आदी उपस्थित होते.

साची डान्स अकादमीमार्फत पेडणे तालुक्यातील वेगवेगळ्या बालकलाकारांना नृत्य भरतनाट्यमाचे प्रशिक्षण देण्यासाठी वर्ग पेडणे तालुक्यात सुरू आहेत. त्यानिमित्ताने वर्षपूर्तीच्या निमित्ताने मांद्रे या ठिकाणी कोलोत्सवाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.



**मांद्रे : येथे कलोत्सव कार्यक्रमाचे उद्घाटन करताना सरपंच राजेश मांद्रेकर, माजी सरपंच ॲड. अमित सावंत, माजी सरपंच बाळा नाईक, साची नाईक, उपसरपंच संपदा आजगावकर, पंच तारा हडफडकर, सपना सावंत, नृत्यवकर्तना साची सावंत व बालकलाकार.**

या कालोत्सवामध्ये बालकलाकारांनी नृत्य भरतनाट्यम् कलाविष्कार सादर केला. त्या सर्व कलाकारांचे मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कुमारी मिस्टी राजेश सावंत यांनी सूत्रसंचालन केले.

ॲड. अमित सावंत सांगितले की, अशा कार्यक्रमातून लहान-लहान मुले मराठीच्या उत्कर्षासाठी पुढे येत असल्याने ही खरोखरच एक कौतुकाची गोष्ट आहे. सध्या मराठीच्या राज्यभाषेसाठी लढा सुरू आहे आणि त्यालाही यश मिळेल, असा विश्वास यावेळी ॲड. सावंत यांनी व्यक्त केला.

मांद्रे सरपंच राजेश मांजरेकर म्हणाले की, शिक्षणाबरोबरच इतर कला क्षेत्रात ज्यांना आवड आहे, त्यांनी आपले करियर घडवावे. त्यासाठी आई-वडिलांनीही आपल्या मुलांना काय हवे त्या कलेशी प्रोत्साहित करा. आपल्या गावाचे नाव उज्वल करत असताना नवीन कलाकारांना घडवण्यासाठी आणि व्यासपीठ उपलब्ध करून देण्याबरोबरच वेगवेगळ्या कलाक्षेत्राला प्रोत्साहनही द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

मांद्रेचे माजी सरपंच तथा विद्यमान पंच बाळा ऊर्फ प्रशांत नाईक यांनी सांगितले की, साची सावंत यांनी केवळ मांद्रेचे नव्हे भारताचे नव्हे तर विश्वावर आपले नाव कोरून मांद्रे गावाला शिखरावर पोहचविले. साची सावंत यांनी विदेशात आपली कला सादर करून अल्पकाळात भरारी घेतली आहे.

यावेळी साची डान्स अकादमी कला विद्यार्थ्यांनी कलाविष्कार सादर केला.

# युपीएससी परीक्षेविषयी आंबिये महाविद्यालयात मार्गदर्शन

टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १०** : संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय विर्नोडा येथील टीआयपी सेलने गोवा विद्यापीठातील विद्यार्थी प्लेसमेंट आणि माजी विद्यार्थी संबंध संचालनालयाच्या करिअर समुपदेशन सेलच्या सहकार्याने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी युपीएससी परीक्षेविषयी मार्गदर्शन आणि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केलेला होता. राज्यातून अधिकाधिक आएएस, आयपीएस आणि आयएफएस अधिकारी घडविणे हा या प्रशिक्षण कार्यक्रमाचा हेतू होता. त्यानिमित्ताने गोवा विद्यापीठातील विद्यार्थी प्लेसमेंट आणि माजी विद्यार्थी संबंध संचालनालयाच्या करिअर समुपदेशन सेलच्या टीमने महाविद्यालयाला भेट देऊन वेगवेगळ्या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जुवांव कोस्टा, गोवा विद्यापीठातील विद्यार्थी प्लेसमेंट आणि माजी विद्यार्थी संबंध संचालनालयाचे संचालक डॉ. रुपेश पात्रे, डॉ.संगीता देसाई, डॉ. आकृती अलर्नकर, आंबिये महाविद्यालयातील टीआयपी सेलच्या मुख्य समन्वयक डॉ. मृणाली जांबोटकर, डॉ. अक्षय साखळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

आंबिये महाविद्यालयातील टीआयपी सेलच्या मुख्य समन्वयक डॉ. मृणाली जांबोटकर यांनी विद्यार्थ्यांना या कार्यक्रमासाठी प्रोत्साहित केले. या कार्यक्रमात १०३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन युपीएससी परीक्षेविषयी मार्गदर्शन सत्राचा लाभ घेतला.

संचालक डॉ. रुपेश पात्रे यांनी विद्यार्थ्यांना युपीएससी परीक्षेचा उद्देश, दृष्टी आणि महत्त्व व राष्ट्र उभारणीतील भूमिका यासंदर्भात मार्गदर्शन केले. युपीएससी परीक्षा मार्गदर्शनच्या समन्वयक डॉ.संगीता देसाई यांनी प्राथमिक, मुख्य परीक्षा, मुलाखतीचे टप्पे, अभ्यासक्रमाचे विभाजन, प्रश्नांची पद्धत याचा आढावा घेतला. सहसमन्वयक डॉ.आकृती अलर्नकर यांनी विद्यार्थ्यांसाठी खुल्या प्रश्नोत्तर सत्राचे आयोजन केले. ज्यातून विद्यार्थ्यांनी स्वत:च्या मनातील प्रश्न विचारून उत्तरे मिळवली.